MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# <u>महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित.</u>

(CIN NO: U40109MH2005SGC153646)

**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ, महापारेषण, अमरावती**
कार्यालयाचा पत्ता - जुने पॉवर हाऊस परिसर, डफरीन हॉस्पिटल मागे, श्रीकृष्ण पेठ, अमरावती 444601.
email: se1600@mahatransco.in

**संदर्भ क्र. अअ/अउदा/प्रकल्प/मंडळ/अम/मासं/** No - 0475 **दि.** 20 JUN 2022

## सुचना (सुधारित)

महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीच्या अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ, अमरावती कार्यालयांकरीता वर्ष २०२२-२३ करिता बाह्यस्त्रोत कंत्राटी पद्धतीने वाहनचालक नियुक्त करण्याकरीता बेरोजगारांनी स्थापन केलेल्या नोंदणीकृत सेवा सहकारी संस्थांकडुन खालील अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>अटी व शर्ती -</u>**

१. संस्थेने अर्ज सादर करताना अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे -

- **अ)** अर्ज सादर करणाऱ्या संस्थेचे संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता.
- **आ)** ठेकेदाराचे नाव, त्याचा कायमस्वरुपी पत्ता व रहीवाशी दाखला.
- **इ)** कंत्राटी कामगार पुरवण्याचा परवाना.
- **ई)** कामगार राज्य विमा योजनेचा कोड नंबर.
- **उ)** भविष्य निर्वाह निधिचा नोंदणी क्रमांक व कोड नंबर.
- **ऊ)** व्यवसाय कर क्रमांक.
- **ऋ)** GST क्रमांक.
- **लृ)** मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम क्रं. १९४८ अंतर्गत व्यवसाय परवाना.
- **ऍ)** कंत्राटदार संस्थेचे बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक व पॅन कार्ड क्रमांक.

२. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. २८-०९-२०१० च्या महाराष्ट्र शासन राजपत्र-१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटीपद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांचे निश्चित केलेले किमान वेतन दर, तसेच कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकाप्रमाणे विशेष भत्ते आणि महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्रं १४२ दि.०३-०१-२०१४ प्रमाणे किमान अधिभार समाविष्ट करुन आलेल्या दरावरच कंत्राटी कामगार पुरवण्याचे हमीपत्र संस्थेस द्यावे लागेल.

३. संस्थेस महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्रं १४२ दि.०३-०१-२०१४ मधील तरतुदींचे व सुचनांचे तंतोतंत पालन करावे लागेल.

४. कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगारांच्या व्याख्या महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्रं १४२ दि.०३-०१-२०१४ मधे नमुद केल्याप्रमाणे असतील.

५. बाह्यस्त्रोत पद्धतीने कंत्राटी कामगार नियुक्त करण्याच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | वाहनचालक (कुशल) |
|---|---|---|
| १ | अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती | १ |

वरीलप्रमाणे अटी व शर्तीची पूर्तता करुन भरलेले अर्ज अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती येथे दि.२८-०६-२०२२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (रविवार व सुटीचे दिवस सोडुन) स्वीकारण्यात येतील. दि.२८-०६-२०२२ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा प्रत्यक्ष कामवाटपात विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी. एकापेक्षा अधिक संस्थांचे अर्ज विहीत कालमर्यादेत प्राप्त झाल्यास लॉटरीपद्धतीने कामाचे वाटप करण्यात येईल. महापारेषण कंपनीचे परिपत्रक क्रं १४२ दि.०३-०१-२०१४ अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती येथे संदर्भार्थ उपलब्ध आहे.

**अधिक्षक अभियंता,**
अतिउच्चदाब प्रकल्प मंडळ,
महापारेषण, अमरावती.